## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झोपुप्रा/उजि. क्र. १/जाहीरसुचना/क्रांतीनगर स.गृ.सं./२/२०१८
दिनांक :- ८ /६/२०१८

# जाहीर सुचना

सदर जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार मुख्यप्रवर्तक श्री. रघुनाथ अनाजी मोरे यांनी मौजे-पाचपाखाडी, तालुका-ठाणे येथील अंतिम भूखंड क्र. १३४ या मिळकतीवरील नियोजित क्रांतीनगर रहिवासी संघ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी धारकांच्या झोपडयांचे क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अंतर्गत "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करणे बाबत विनंती अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रानुसार सदर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार धारक | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | “झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र” म्हणून घोषित करावयाचे क्षेत्र (चौ.मि.) |
|---|---|---|---|
| १३४ | महाराष्ट्र सरकार | २५७२.२६ चौ.मी. | २०६०.५० चौ.मी. |
| | रस्त्यापैकी | - | ६५.०० चौ.मी. |
| | एकूण | - | २१२५.५० चौ.मी. |

उपरोक्त नमुद मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत जमीन मालक अथवा कोणाही हितसंबंधीतांच्या हरकती /आक्षेप असल्यास, त्यांनी आपली हरकत / आक्षेप सदर जाहीर सुचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांचेकडे लेखी दाखल करणे आवश्यक आहे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास उपरोक्त कार्यवाही करण्यात येईल.

**उपजिल्हाधिकारी**
**व सक्षम प्राधिकारी ठाणे क्र. १**

ठिकाण - ठाणे (पश्चिम)
दिनांक - ८/६/२०१८

**ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम) -४०० ६१०.**
**दुरध्वनी क्र.०२२-२५८४३९००, mail ID- thane@sra.gov.in**